मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# निळ्या पूररेषेतील कारवाईस तीव्र विरोध

## अनधिकृत बांधकामे, घरे, दुकाने पाडण्याचे महापालिकेचे नियोजन : कारवाईस स्थगिती देवून नद्यांना संरक्षक भिंत बांधण्याची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

मुळा, पवना, इंद्रायणी नद्यांच्या निळ्या पूररेषेतील अनधिकृत बांधकामे, घरे, दुकाने पाडण्याचे महापालिकेचे नियोजन आहे. याबाबत सर्व्हेक्षण सुरू आहे. यास नागरिकांचा विरोध असून, या कारवाईस स्थगिती देवून नद्यांना संरक्षक भिंत बांधण्याची मागणी निळी पूररेषा संरक्षण समितीने केली आहे.

शहरातील तीनही नद्यांच्या पूररेषेतील बांधकामे हटविण्याच्या निर्णयाविरोधात पूर संरक्षण समितीची सांगवीत बैठक झाली. त्यापूर्वी बाधित रहिवासी व समितीने जुनी सांगवीतील संगमनगर चौकात, 'आमची घरे पाडली तर आम्ही तुमचे सरकार पाडू' अशा आशयाचा फलक लावून सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र, प्रशासन कारवाईवर ठाम असून, महापालिकेने सर्व्हेक्षण सुरू ठेवले आहे. दरम्यान, निळी पूररेषा व रस्ता रुंदीकरण यामुळे बाधित बांधकामांना यापूर्वीच भूसंपादन विभागाने नोटीस बजावल्या आहेत. नागरिकांच्या सूचना व हरकतींवर सुनावणी झाली आहे. प्रशासनाच्या निर्णयाची सर्वाधिक झळ जुनी सांगवीतील मुळा नदी किनारा भागातील बाधितांना बसणार आहे. याचबरोबर रस्ता रुंदीकरणाचाही फटका त्यांना बसणार आहे. तसेच, सांगवी-बोपोडी पुलाचे काम पूर्ण झाले आहे. सुशोभीकरणानंतर पूल रहदारीसाठी खुला होईल. तेव्हा मुळा नदी किनारा रस्ता रुंद करावा लागणार आहे. त्याची भीती नागरिकांना आहे.



### वेगवेगळ्या समित्या स्थापन

» निळी पूररेषा संरक्षण समितीने बाधितांची बैठक घेऊन वेगवेगळ्या समित्या तयार केल्या आहेत. त्यात ६० सदस्यांची युवा समिती आहे. तिच्या अध्यक्षपदी रूपेश यादव, उपाध्यक्षपदी श्रावणी कांबळे, सरचिटणीसपदी अर्चना कांबळे, सचिवपदी रितेश भिंगारे आणि खजिनदारपदी अनिकेत नायकुडे यांचा समावेश आहे. ६५ जणांची ज्येष्ठ सदस्य सल्लागार समिती आहे. यात अध्यक्ष अप्पासाहेब शेवाळे (निवृत्त एसीपी), उपाध्यक्ष सुजाता निकाळजे, सचिव दरबार सिंग, सरचिटणीस ए. एम. मुलाणी, कोषाध्यक्ष युवराज बिले यांचा समावेश आहे.

### समितीची बैठक

» मुळा नदी किनारा व संगमनगर भागातील सुमारे सहाशे कुटुंबांची सर्वसाधारण सभा घेण्यात आली. ज्यामध्ये तीन हजार नागरिक उपस्थित होते. या भागाची लोकसंख्या सुमारे चार हजार आहे. निळ्या पूररेषेत सुमारे दोन लाख घरे आहेत. त्यांच्यावरील कारवाई थांबवण्यासाठी भविष्य कृती समिती नियुक्त केली आहे. या समितीतील सदस्य आजूबाजूच्या वस्तीतील नागरिकांना भेटतील. त्या वस्त्यांमध्ये समित्या स्थापन करण्यास मदत करतील, असे बैठकीत ठरले. दर आठवड्याला दोन समित्या नियुक्त करण्याचे उद्दिष्ट आहे. दोन ऑक्टोबर रोजी प्रत्येक समिती सदस्याला दोन निळे शर्ट देण्यात येणार आहेत. ज्यावर 'ब्लू फ्लड त्सुनामीने क्रूर सरकारला बुडवा' असे मराठी व इंग्रजीत लिहिलेले असेल. दोन्ही समित्यांनी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांना ई-मेलद्वारे पत्र पाठवून कारवाईला स्थगिती देण्याची मागणी केली आहे. दरम्यान, जमलेल्या सदस्यांनी तीन लाखांचा निधी गोळा करून शहरभर बॅनर व एक हजार निळे टी शर्ट खरेदी करण्याचा ठराव केला. समित्यांची बैठक दर आठवड्याला शनिवारी घेण्यात येणार आहे. तसेच, मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांना दर आठवड्याला पाचशे निषेध पत्र पोस्टाने पाठविण्यात येणार आहेत.

> "पूररेषेतील बांधकामे पाडू नयेत. याबाबत प्रशासन व सरकारने रहिवाशांचा विचार करावा, अशी आमची मागणी आहे.
>
> - सुजाता निकाळजे, उपाध्यक्ष, निळी पूररेषा संरक्षण समिती.

# शहराच्या जडणघडणीत मल्याळी समाजाचेही महत्वपूर्ण योगदान : शहराध्यक्ष शंकर जगताप

## ओणम सणानिमित्त मल्याळी बांधवांना शुभेच्छा दिल्या

**पिंपरी | प्रतिनिधी**

मल्याळी समाज हा उच्चशिक्षित, सुसंस्कृत व शांतताप्रिय म्हणून संपूर्ण जगात प्रसिद्ध आहे. त्यामुळे जगाच्या कानाकोपऱ्यात हा समाज पसरला आहे. दुधात साखर मिसळावी, तसं मल्याळी बांधव जाल तिथं एकजीव होऊन जातो. नोकरी, धंदा, व्यवसायाच्या निमित्ताने अनेक मल्याळी परिवार पिंपरी-चिंचवडमध्ये येऊन स्थायिक झाले. एवढेच नाही तर तुम्ही पुरते पिंपरी-चिंचवडकर झालात. या शहराच्या विकासात व जडणघडणीत आपणा सर्वांचे महत्वपूर्ण योगदान आहे असे प्रतिपादन, पिंपरी चिंचवड शहर भाजपचे अध्यक्ष शंकर जगताप यांनी केले आहे.

ओणम सणानिमित्त किवळे येथील लेखा फार्म येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात शंकर जगताप बोलत होते. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून केरळ राज्याचे राज्यपाल मा.आरिफ मोहम्मद खान यांच्यासह खासदार श्री.श्रीरंग आप्पा बारणे, सी.ई.ओ.आयआयटीबी श्री.उन्नीकृष्णन नायर सर्व्हिस सो.देहूरोड चे अध्यक्ष श्री.के.मनिकांतन नायर, जनरल सेक्रेटरी श्री.दिलीपकुमार नायर, श्री.बालगंगाधरण, उपाध्यक्ष श्री.हरिकुमार पिल्ले, श्री.पी.एन.के.नायर, श्री.बाळासाहेब तरस, भाजपा उपाध्यक्ष श्री.राकेश नायर, दक्षिण भारतीय आघाडी पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष श्री.सुरेश नायर आणि मल्याळी समाजातील बांधव उपस्थित होते.



मल्याळी बांधवांना ओणम सणाच्या शुभेच्छा देताना जगताप म्हणाले की, मल्याळी नववर्षाचा शुभारंभ ओणम सणापासून होत असल्याने या सणाला मल्याळी समाजात खूप महत्त्व आहे. मी आपल्या आनंदात सहभागी होण्यासाठी इथं आलो आहे. मला आपल्या परिवारातील सदस्य म्हणून इथे निमंत्रित केलंत त्याबद्दल सर्वप्रथम आपणास मनापासून धन्यवाद देतो.

बळीराजा आपल्या प्रजेला भेटण्यासाठी या दिवशी पृथ्वीवर परत येतो, अशी श्रद्धा आहे. बळीराजा प्रजेची खूप काळजी घेणारा, न्यायी, दानशूर व पराक्रमी राजा होता. त्याच्या स्वागतासाठी आपण ओणम सण मोठ्या उत्साहात साजरा करतो. अशा या प्रजाहितदक्ष राजाचं राज्य पुन्हा आपल्याला अनुभवला मिळावं, हीच ओणमच्या निमित्तानं परमेश्वराकडे प्रार्थना करतो.

माझे अनेक मल्याळी मित्र आहेत. अनेक मल्याळी परिवारांशी माझे अत्यंत घरोब्याचे संबंध आहेत. हे आपलं प्रेमाचं नातं आपण अधिक दृढ करूयात आणि बळीराजाचं राज्य पुन्हा आणूयात, या सद्भावना पुन्हा व्यक्त करत, शंकर जगता प यांनी उपस्थितांना ओणम सणाच्या शुभेच्छा दिल्या.

# पुणे मेट्रो मार्ग 3 च्या कामाचा उपमुख्यमंत्री अजित पवारांनी घेतला आढावा

## 24 तास बांधकामांना परवानगी देण्याचे पोलिसांना निर्देश



**पिंपरी | प्रतिनिधी**

माण-हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो-३ मार्गाच्या कामाचा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज आढावा घेतला. या कामाला गती मिळावी, यासाठी सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी चोवीस तास गर्डर टाकण्याचे काम व बांधकामाला परवानगी द्यावी, असे निर्देश त्यांनी पोलिसांना दिले. या मार्गावरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी एकात्मिक दुमजली उड्डाणपुलाच्या खालील रस्ते सुव्यवस्थित ठेवण्याची काळजी घ्यावी, असे देखील यावेळी अजित पवार यांनी नमूद केले.

मेट्रोच्या कामामुळे रस्ते किंवा ड्रेनेज लाईन खराब झाल्यास ती तातडीने दुरुस्त करावीत, असे अजित पवार यावेळी म्हणाले. गरज भासल्यास नवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा सल्ला त्यांनी दिला. सध्या सुरू असलेल्या मेट्रोच्या कामासह रस्त्यांची दुरवस्था झाल्याने वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण झाला आहे. ही कामे वेळेत न झाल्यास संबंधित कंपनीवर कारवाई करण्यात येईल, असे अजित पवार यांनी सांगितले. मेट्रोच्या कामाला गती देण्यावर अजित पवार यांनी भर दिला, ज्याचा फायदा नागरिकांना होणार आहे.

# रस्ता दुरुस्तीसाठी पुन्हा मेट्रोला नोटीस

## पीआमआरडीए आयुक्तांनी घेतली तक्रारींची दखल, वर्दळीच्या रस्त्याचे प्राधान्याने काम करण्याचे निर्देश

**पुणे | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड या दोन्ही ठिकाणी जोडणाऱ्या पाषाण, बाणेर, कृषी महाविद्यालय या महत्त्वाच्या ठिकाणी रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. आयटी कर्मचारी, कामगार यासोबतच विद्यार्थी वर्गाला याचा सामना करावा लागतो. पावसाळ्यात सर्वाधिक त्रास नागरिकांनी सहन केला. मात्र, यावर कोणताही तोडगा न निघाल्याने नागरिकांमध्ये नाराजी होती.

दरम्यान, मेट्रोला यापूर्वीच नोटीस बजावूनही वेळेवर काम न केल्याने पीएमआरडीए आयुक्तांनी गंभीर दखल घेतली आहे. पुणे आयटीसीटी मेट्रो रेल लिमिटेडच्या (पीआयटीसीएमआरएल) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना तातडीने कामे पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत.



गत काही दिवसांत गणेशखिंड, पाषाण आणि बाणेर रस्त्यासह आदी भागातील महत्त्वाच्या रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. याबाबत नागरिकांनी तक्रारी केल्या होत्या. तसेच, या खड्ड्यांमुळे वाहतुकीवरही मोठा परिणाम होत होता. वाहतूक कोंडीबरोबरच प्रवाशांचा वेळ वाढला आहे. परिणामी वाहनधारकांसह नागरिकांना अडचणी येत असल्याने पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (पीएमआरडीए) आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी या 'बांधा, वापरा, हस्तांतरित करा' या तत्त्वावर राबवण्यात येणाऱ्या यंत्रणेला या वर्षात सलग दुसऱ्यांदा नोटीस बजावली आहे. तसेच, कामाची गती वाढवण्याबाबत सूचना दिल्या आहेत.

पुणे आयटीसीटी मेट्रो रेल लिमिटेडकडे संबंधित भागातील रस्त्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. मात्र काही दिवसांपासून गणेशखिंड, पाषाण, बाणेरसह कृषी महाविद्यालयाच्या रस्त्याची दुरवस्था झाल्याने वाहनचालकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. संबंधित रस्ते कायम वर्दळीचे असल्यामुळे या रस्त्यावरून शेकडो दुचाकी वाहनांची वर्दळ असते. पाषाण, बाणेर, कृषी महाविद्यालय या महत्त्वाच्या ठिकाणी रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. आयटी कर्मचारी, कामगार यासोबतच विद्यार्थी वर्गाला याचा सामना करावा लागतो. पावसाळ्यात सर्वाधिक त्रास नागरिकांनी सहन केला. मात्र, यावर कोणताही तोडगा न निघाल्याने नागरिकांमध्ये नाराजी होती.

खराब रस्त्यामुळे वाहनधारकांना अतिशय हळुवारपणे खड्डे चुकवत त्यातून मार्ग काढावा लागत आहे. या रस्त्यांची संबंधित यंत्रणेने करारानुसार अपेक्षितरित्या दुरुस्ती करणे गरजेचे आहे. मात्र वारंवार सांगूनही पीआयटीसीएमआरएल याकडे दुर्लक्ष करत असल्याची स्थिती आहे. त्यामुळे नागरिकांसह वाहनधारकांच्या अडचणी लक्षात घेऊन पीएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी पुणे आयटीसीटी मेट्रो रेल लिमिटेड यांना शुक्रवारी नोटीस बजावली.

### पाच दिवसांची मुदत

» मेट्रोच्या कामामुळे रस्त्यांची दुरवस्था झाल्याने आयुक्तांनी त्याची स्वतः दखल घेतली. माण- हिंजवडी ते शिवाजीनगर या भागातील रस्त्यासंदर्भातही गत १५ दिवसांपूर्वी संबंधितांना नोटीस बजावण्यात आली होती. मात्र, त्याबाबत कोणती कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे अखेर पुन्हा २० सप्टेंबरला नोटीस देऊन पाच दिवसांत म्हणजेच २५ सप्टेंबरपर्यंत दुरुस्ती करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

---

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीर संपन्न

## भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने रक्त संकलन अभियाना अंतर्गत शिबिराचे आयोजन

**पुणे | प्रतिनिधी**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७४ व्या वाढदिवसानिमित्त भाजपा युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण राज्यामध्ये 'रक्त संकलन अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत चिंचवड येथे भव्य रक्तदान शिबीर संपन्न झाले.

युवा मोर्चा प्रदेश सचिव अजित कुलथे आणि शहर सरचिटणीस शिवम डांगे यांच्या नेतृत्वाखाली चिंचवड येथील गोखले हॉल येथे 'पिंपरी चिंचवड ब्लड बँक' यांच्या माध्यमातून हे भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या अभियानात नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदविला.

भारतीय जनता युवा मोर्चाच्या माध्यमातून सातत्याने समाज उपयोगी कार्यक्रम राबविण्यात येतात. तसेच युवकांसाठी स्वयंरोजगार, स्किल डेव्हलपमेंट, केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांचा लाभ मिळवुन देण्यासाठी सातत्याने मेळावे, शिबीर या सारख्या कार्यक्रमांचे संपूर्ण महाराष्ट्रात आयोजन केले जाते. त्याच धर्तीवर नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त 'रक्त



संकलन अभियान' संपूर्ण राज्यभर राबवून समाजिक बांधिलकीची जतन करण्याचे काम युवा मोर्चाच्या वतीने करण्यात आले.

यावेळी भाजपा पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष शंकर जगताप, भाजपा युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अनुप मोरे, विधान परिषद आमदार उमाताई खापरे, भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य मोरेश्वर शेडगे, भाजपा प्रदेश निमंत्रित सदस्य महेश कुलकर्णी, युवा मोर्चा शहराध्यक्ष तुषार हिंगे, युवा मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष तथा पिंपरी चिंचवड शहर प्रभारी बाळासाहेब घोटकुले, युवा मोर्चा प्रदेश सचिव तेजस्विनी कदम, भाजपा ओबीसी मोर्चा प्रदेश सदस्य गणेश वाळुंजकर, माजी नगरसेवक सुरेश भोईर, भाजपा पिंपरी चिंचवड शहर उपाध्यक्ष रविंद्र देशपांडे, सचिव मधुकर बच्चे, विजय सिनकर, प्रभाग अध्यक्ष तथा माजी प्रभाग स्वीकृत सदस्य विठ्ठल भोईर, पै. विजय गावडे, धनंजय शाळिग्राम, प्रदीप सायकर, नितीन भोगले, रविंद्र प्रभुणे, हरीश मोरे, दिपाली कलापुरे, युवा मोर्चा शहर सरचिटणीस सतिश नागरगोजे, सनी बारणे, मोहन राऊत, सुधीर साळुंखे, राहुल खाडे, सचिन बंदी, मंडल अध्यक्ष सुमित घाटे, सोशल मिडिया संयोजक आदम मुलानी, शुभांगी कसबे यांच्यासह प्रमुख पदाधिकाऱ्यांनी शिबीराला उपस्थिती लावली.

---

# पुणे विमानतळ आता संत तुकाराम महाराजांच्या नावाने ओळखले जाणार

## लोहेगाव विमानतळाचे नाव बदलण्यास महाराष्ट्र मंत्रिमंडळाने मंजुरी दिली

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील एकनाथ शिंदे सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. पुणे विमानतळाचे नाव बदलण्याच्या प्रस्तावाला शिंदे सरकारने मंजुरी दिली आहे. आता पुण्याच्या लोहगाव विमानतळाचे नाव बदलून जगद्गुरू संत तुकाराम महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ पुणे करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. निवडणूक आयोगाच्या महाराष्ट्र दौऱ्यापूर्वी आज मंत्रिमंडळाची मोठी बैठक झाली, त्यात हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. शिंदे सरकारने वारकरी समाजाला मोठी भेट दिली आहे.




विमानतळाचे नाव बदलण्यासाठी गेल्या अनेक दिवसांपासून प्रयत्न सुरू होते. वारकरी संप्रदायातील १७ व्या शतकातील मराठी संत तुकाराम महाराज यांच्या नावावरून विमानतळाचे नाव बदलण्याच्या प्रस्तावाला आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंजुरी दिली. त्यासाठी पायाभरणी कार्यक्रमादरम्यान राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही प्रस्ताव आणून मंजुरीसाठी पाठवण्याची घोषणा केली होती, त्यानंतर आज हा निर्णय घेण्यात आला आहे.

पुणे विमानतळ लोहगाव विमानतळ म्हणूनही ओळखले जाते. या निर्णयानंतर वारकरी संप्रदायात आनंदाचे वातावरण असतानाच राजकीय जाणकार या निर्णयाला शिंदे सरकारचा मास्टर स्ट्रोक आणि महाराष्ट्राच्या आगामी विधानसभा निवडणुकीपूर्वी वारकरी व्होटबँकेला टॅप करण्यासाठी उचललेले उत्कृष्ट पाऊल असल्याचे सांगत आहेत. वारकरी समाजाच्या कार्यक्रमात पीएम मोदीही सहभागी झाले आहेत, त्यामुळे आगामी काळात हे नामकरणाचे राजकारण व्होट बँकेच्या दृष्टिकोनातून खूप महत्त्वाचे ठरणार आहे. राज्य सरकारच्या सामान्य प्रशासन विभागाने हा निर्णय घेतला होता तो मंत्रिमंडळाकडे पाठवण्यात आला असून आज मंत्रिमंडळाने त्याला मान्यता दिली आहे.

लोहेगाव आणि तुकाराम महाराज यांचे अतूट नाते आहे. आता हा प्रस्ताव राज्य सरकारने मंजूर केल्यानंतर तो केंद्र सरकारकडे पाठवला जाणार असून, केंद्रीय मंत्रिमंडळ लवकरच याबाबत निर्णय घेणार आहे.

# समाविष्ट गावातील खंडित वीज पुरवठ्याचा प्रश्न तात्काळ सोडवा

## स्थायी समितीचे माजी सभापती अजित गव्हाणे यांनी महावितरणच्या कारभाराविषयी संताप व्यक्त केला

**पिंपरी | प्रतिनिधी**

भोसरी विधानसभा क्षेत्रातील समाविष्ट गावांना खंडित वीज पुरवठ्यामुळे अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या भागातील वीज वितरण कंपनीचा अतिशय मनमानी कारभार आहे. एखाद्याच्या दबावाखाली येथील अधिकारी काम करतात का असा प्रश्न वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यावरून निर्माण होतो. खंडित वीज पुरवठ्याच्या समस्येमुळे आमच्या भावना अतिशय तीव्र आहेत. मात्र तरीही आम्ही सहकार्याची भूमिका ठेवली असून येथे दोन महिन्यात खंडित वीज पुरवठ्याच्या समस्येवर तोडगा काढा अशा शब्दात रविवारी (दि.22) स्थायी समितीचे माजी सभापती अजित गव्हाणे यांनी महावितरणच्या कारभाराविषयी संताप व्यक्त केला.




शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या रूपाली आल्हाट यांच्या नेतृत्वाखाली मोशी शिव रस्ता येथे जन आक्रोश आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते. मोशी, बोऱ्हाडे वाडी, संजय गांधीनगर नगर, तूपेवस्ती, गायकवाडवस्ती, शिव रोड, चिखली, जाधववाडी, संभाजीनगर, नागेश्वर नगर या सर्वच भागात गेल्या वर्षभरापासून विजेचा लपंडाव सुरू आहे. यामुळे वैतागलेल्या नागरिकांनी जन आक्रोश आंदोलनाचे आयोजन केले होते. यावेळी स्थायी समितीचे अध्यक्ष अजित गव्हाणे बोलत होते. या जनआक्रोश मोर्चासाठी शिवसेना पुणे जिल्हा संघटिका सुलभा उबाळे, माजी नगरसेवक माजी नगरसेवक धनंजय आल्हाट ,वसंत बोराटे, ज्ञानेश्वर बोऱ्हाडे, नीलेश मुटके, परशुराम आल्हाट, नितीन बोंडे, विनायक रनसुभे, आशा भालेकर, गौरी घंटे, काटे ताई, सुनील समगिर, सागर बोराटे, गणेश गायकवाड, काका बोराटे, नीलेश पाठारे, नितीन लगाडे, परमेश्वर आल्हाट, राहुल पाटील, किरण जाधव, कदम काका, संदीप आल्हाट, आप्पा वलांडे, अशोक गायकवाड, सचिन कडू, जोशी साहेब, मोहोळकर काका, राहुल गरड, नितीन काकड, रविराज जोशी, सचिन कडू तसेच महाविकास आघाडीचे पदाधिकारी या भागातील अनेक नागरिक उपस्थित होते. सोसायटी धारकांचा या आंदोलनात मोठा सहभाग पाहायला मिळाला.

यावेळी अजित गव्हाणे म्हणाले, मोशी, बोऱ्हाडे वस्ती, डुडुळगाव तसेच लगतच्या चऱ्होली यासारख्या गावांचा विचार केला तर शहरात इतर भागांच्या तुलनेने येथे मूलभूत सुविधांचा देखील अभाव आहे. खड्डे, पाणी यांची समस्या मोठी आहेच. परंतु त्याहूनही अधिक खंडित वीज पुरवठ्याची समस्या सुटलेली नाही. याला कारण केवळ गेल्या दहा वर्षातील नियोजनाचा अभाव आहे. या भागात प्रचंड नागरिकरण वाढत असताना वीज पुरवठ्याबाबत सक्षम यंत्रणा उभारण्याबाबत गेल्या दहा वर्षात ठोस उपाययोजना केली नसल्याचे दिसून येते. या भागात ट्रान्सफॉर्मर वाढवणे गरजेचे असताना, आहे त्याच यंत्रणेवर अजूनही वीज पुरवठा होत असल्यामुळे वीज पुरवठ्याबाबत अनेक तक्रारी येथील नागरिकांच्या आहेत. याबाबत वीज वितरण विभागाकडे वारंवार तक्रारी करूनही कोणतीच उपाय योजना केली गेली नसल्याचे अजित गव्हाणे म्हणाले. महावितरण चा हा गंठण कारभार कोणाच्या दबावाखाली सुरू आहे का? असाही प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे. नवीन गावांना खंडित वीज पुरवठ्याचा मोठा त्रास आहे. नागरिक वारंवार तक्रारी करतात. त्यामुळे आता आमच्या भावना अतिशय तीव्र आहेत. नागरिकांचे हाल लक्षात घेऊन येत्या दोन महिन्यात महावितरणने याबाबत सविस्तर अहवाल तयार करावा. यासाठी आम्ही देखील पाठपुरावा करू. या भागातील वीज जोडणी, ट्रान्सफॉर्मर याबाबतचे प्रश्न आम्ही देखील सरकार दरबारी नेऊ .”नागरिकांच्या हिताची कामे करा, आम्ही सहकार्याचीच भावना ठेवू” असे देखील गव्हाणे यावेळी म्हणाले.

### अन्यथा जनक्षोभ उसळल्याशिवाय राहणार नाही : रुपाली आल्हाट

» रूपाली आल्हाट म्हणाल्या खंडित वीज पुरवठ्यामुळे आम्हाला अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. महिला सातत्याने याबाबत तक्रारी करत असतात. घरात दोन ते तीन तास वीज नसते. आम्ही वेळेवर बिल भरतो तरीही खंडित वीज पुरवठ्याचा त्रास कायम आहे. परशुराम आल्हाट म्हणाले लाखो रुपयांचे घर घेऊन घरात वीज नाही. यामुळे नागरिकांच्या भावना तीव्र आहेत याची दखल महावितरणच्या अधिकाऱ्यांनी घ्यावी अन्यथा जनक्षोभ उसळल्याशिवाय राहणार नाही.

# कुणाल आयकॉन रस्ता होणार नव्याने विकसित

## शिवार चौक ते गोविंद गार्डन चौक रस्त्यासाठी 55 कोटी रुपये मंजूर : पादचारी मार्ग, सायकल ट्रॅकसह साकारणार अर्बनस्ट्रीट

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपळे सौदागर येथील शिवार चौक ते गोविंद गार्डन चौक (कुणाल आयकॉन रोड) रस्ता नव्याने विकसित करण्यात येत आहे. पिंपळे सौदागरमधील वाहतूक कोंडी कमी व्हावी, म्हणून हा रस्ता केला जाणार आहे. या रस्त्यासाठी स्थायी समितीने तब्बल ५५ कोटी रुपये मंजूर केले आहेत. या प्रकल्पाद्वारे रस्त्याचे १८ मीटर आणि १२ मीटर रुंदीकरण केले जाणार आहे.



पिंपळे सौदागरमधील कुणाल आयकॉन रस्ता हा वाकड ते नाशिक फाटा रोड, जुन्या मुंबई-पुणे आणि मुंबई-बेंगळुरू महामार्गांसह प्रमुख मार्गांना जोडतो, ज्यामुळे हा शहरातील एक महत्त्वाचा मार्ग आहे. या रस्त्याचे रुंदीकरण करून अर्बन स्ट्रीटने रस्ता तयार केला जाणार आहे. ३० महिन्यांच्या कालावधीमध्ये प्रकल्पाचे काम पूर्ण केले जाणार आहे.

दरम्यान, या प्रकल्पामध्ये इतर आवश्यक सेवांबरोबरच पावसाळी पाण्याचा निचरा होण्यासाठी नवीन पावसाळी वहन नलिका, जलनिस्सारण वाहिनी, पाणीपुरवठा वाहिनी, पथदिवे आणि दिशादर्शक सूचनाफलक आदी सुविधांचाही समावेश असणार आहे. तसेच प्रकल्पासाठी अर्बन ट्रान्सपोर्ट फंडद्वारे (यूटीएफ) निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे. महापालिकेच्या स्थापत्य प्रकल्प विभागाकडून या रस्त्याचे काम करण्यात येत आहे.

### प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये

» प्रकल्पाची किंमत ५५ कोटी रुपये (प्रशासकीय मान्यता)
» निविदा रक्कम ४२.४३ कोटी रुपये
» निविदा स्वीकृती रक्कम ३३.६७ कोटी रुपये
» प्रकल्पाची मुदत ३० महिने
» निधी स्रोत अर्बन ट्रान्सपोर्ट फंड (यूटीएफ)

“ शिवार चौक ते गोविंद गार्डन (कुणाल आयकॉन रोड) रस्त्याच्या विकासामुळे वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणावर कमी होईल आणि रहिवाशांना सुरक्षित आणि सुरळीत प्रवासाचा अनुभव घेता येईल. या रस्त्याचे अर्बन डिझाईननुसार आधुनिकीकरण करण्यात येणार असल्याने पादचारी, सायकलस्वार तसेच अबालवृद्ध नागरिकांसाठी एक सुरक्षित रस्ता तयार करण्यावर महापालिका भर देणार आहे. नागरिकांच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन असे पायाभूत सुविधा प्रकल्प कार्यक्षमतेने पूर्ण करण्यासाठी महापालिका कटिबद्ध आहे.

**- शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

# बाह्यवळण मार्गासाठी तीनशे कोटींचा निधी

## कात्रज- देहूदरम्यानची वाहतूक कोंडी सुटणार : तीनशे कोटींच्या निधीला तत्त्वत: मंजुरी



**पुणे | प्रतिनिधी**

पुणे-बेंगळुरू बाह्यवळणावरील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी वाहतूक पोलिसांनी प्रस्तावित केलेल्या उपाययोजनांना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सहमती दर्शविली आहे. त्यानुसार या उपाययोजना करण्यासाठी तीनशे कोटींचा निधी उपलब्ध करून देण्यास गडकरी यांनी तत्वत: मंजुरी दिली आहे.

पुणे-बेंगळुरू बाह्यवळण रस्त्यावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री, कोथरूडचे आमदार चंद्रकांत पाटील यांनी वाहतूक पोलिसांबरोबर चर्चा करून उपाययोजना करण्याची सूचना केली होती. त्यानुसार पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार, अतिरिक्त आयुक्त मनोज पाटील यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे सरव्यवस्थापक अंशुमाळी श्रीवास्तव, प्रकल्प संचालक संजय कदम, महापालिकेच्या पथ विभागाचे मुख्य अभियंता अनिरूद्ध पावसकर यांच्यासमवेत उपाययोजनांचा आराखडा तयार केला आहे.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी पुणे दौऱ्यावर असताना या आराखड्याचे सादरीकरण त्यांच्यासमोर करण्यात आले. त्यावेळी आराखड्यानुसार उपाययोजना करण्यासाठी तीनशे कोटींचा निधी तत्त्वत: मंजूर करण्यात आल्याची माहिती मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

**आराखड्यातील प्रस्तावित कामे कोणती?**

महापालिकेच्या माध्यमातून भूमकर अंडरपास शेजारी प्री-कास्ट बॉक्स पद्धतीचा जोड अंडरपास करण्यात येणार आहे. ननावरे अंडर पासजवळ किया शोरुम येथे आणि रिनॉल्ट शोरुम येथे प्रत्येकी एक असे दोन अंडरपास प्रस्तावित आहेत. नवले ब्रीज येथे नऱ्हेच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांसाठी एका मार्गिकेवर कॉन्टिलिव्हर ब्रीज बांधून इतर सर्व मार्गिका सिग्नलमुक्त करण्यात येतील. पाषाण-सूस रस्त्यावरून महामार्गाला जोडणारा जोड रस्ता आणि सेवा रस्त्याची कामे करण्यात येणार आहेत. राधा हॉटेल येथील पीएमपीएमएलची जागा आणि हॉटेल ऑर्किड समोरील जागेवर १०० मीटर मार्जिन रस्ता प्रस्तावित असून याठिकाणी अंडरबायपास तयार करण्यासाठी व्यवहार्यता तपासणी करण्यात येईल. राष्ट्रीय महामार्गाच्या दोन्ही बाजूच्या सेवा रस्त्यांपैकी २७.९९ किलोमीटर लांबीचे आणि १२ मीटर रुंदीचे सेवा रस्ते प्रस्तावित आहेत. महापालिकेकडून ४९.१२ लांबीचा व १२ किमी रुंदीचा बाह्य सेवा रस्ता तयार करण्यात येणार असून बालेवाडीकडून मुंबईला जोडण्यासाठी उड्डाणपूल उभारण्याचे नियोजित आहे.

**पुणे-बेंगळुरू बाह्यवळणाची वस्तुस्थिती**

- गेल्या पाच वर्षांत सुमारे २० लाख वाहनांची वाढ.
- पुण्याला रिंग रोड नसल्याने पुणे-बेंगळुरू रस्त्याचा वापर रिंग रोड म्हणून करण्यात येतो.
- या रस्त्याची निर्मिती १९९४ मध्ये दुपदरी महामार्ग म्हणून करण्यात आली होती.
- हा बायपास २००० मध्ये रस्ता वाढवून चौपदरी करण्यात आला.
- २०१० मध्ये सहापदरी रस्ता प्रस्तावित झाला असून या सहा रस्त्यांची कामे अजून काही ठिकाणी प्रगतिपथावर आहेत.
- या रस्त्यावर गेल्या तीन वर्षांत शंभराहून अधिक अपघात झालेले असून त्यामध्ये ६८ लोकांनी जीव गमावलेला आहे.

> केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी पुणे-बेंगळुरू रस्त्यावरील उपाययोजनांना तत्त्वतः मान्यता दिली आहे. त्यासाठी एनएचआय, पुणे महापालिका तसेच पुणे पोलिसांनी एकत्रिकपणे या उपाययोजना करण्यास सांगितले आहे. या उपाययोजनांनंतर या बाह्यवळण रस्त्यावरील वाहतूक कोंडी फुटणार आहे.
>
> - चंद्रकांत पाटील, उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री.

# पुण्यातल्या खड्ड्यांची खुद्द राष्ट्रपतींनी घेतली दखल

## पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या दौऱ्यापूर्वी खड्डे बुजवण्यासाठी पोलिसांचे पालिकेला पत्र



**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील खड्डयांवरून देशाच्या प्रथम नागरिक असलेल्या राष्ट्रपतींच्या कार्यालयाकडून नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. पंतप्रधानांच्या पुणे दौऱ्यापूर्वी हे खड्डे बुजवावेत, असे राष्ट्रपती कार्यालयानेच पुणे पोलिसांना लिहिलेल्या पत्रात कळवले आहे. या पत्रामुळे प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

पावसाळ्यात शहरातील खड्डे पडून रस्त्यांची चाळण झालेली आहे. शहरातील रस्त्यावरील खड्डयांवरून नेहमीच वाद चर्चा झडत असतात. तसेच, राजकारणही रंगते. पुण्याचे रस्ते आणि वाद हे एक वेगळे समीकरणच आहे. आता याच खड्डयांवरून एक नवा वाद उफाळण्याची शक्यता आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या २ आणि ३ सप्टेंबरला पुणे दौऱ्यावर आलेल्या होत्या. पुण्यातील राजभवनला त्यांचा मुक्काम होता. तिथून कार्यक्रमांसाठी शहरातील वेगवेगळ्या ठिकाणी जातांना राष्ट्रपतींच्या ताफ्यातील वाहनांना पुण्यातील खड्ड्यांचा सामना करावा लागला. राष्ट्रपती कार्यालयाने ही नाराजी पुणे पोलिसांना कळवली असल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, येत्या २६ सप्टेंबरला पंतप्रधान नरेंद्र मोदी पुण्यात येणार आहेत. या दौऱ्यापूर्वी रस्त्यांवरील खड्डे लवकरात लवकर बुजवण्यात यावेत यासाठी पुणे पोलिसांनी महापालिका आयुक्तांना पत्र पाठवले आहे. राष्ट्रपती कार्यालयाने व्यक्त केलेली नाराजी पाहता पंतप्रधानांच्या दौऱ्यापूर्वी रस्त्यांवरील खड्डे बुजवावेत, असे महापालिकेला कळवण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २६ सप्टेंबर रोजी शिवाजीनगर ते स्वारगेट मेट्रोचे उद्घाटन करण्यात येणार आहे.

तसेच स्वारगेट ते कात्रज या भूमिगत मेट्रोचे भूमिपूजनदेखील त्यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर त्यांची स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर सभा होणार आहे. त्यानंतर ते पुणे मुक्कामी राहणार आहेत. त्यासाठीची सर्व व्यवस्था प्रशासनाकडून सुरू करण्यात आली आहे. दुसऱ्या दिवशी मोदी खडकी येथील विकसित भारत या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. पंतप्रधान मोदी हे महाराष्ट्रातील महायुतीच्या नेत्यांची भेट घेऊन त्यांच्याशी आगामी विधानसभा निवडणुकीबाबत चर्चा करण्याची शक्यता आहे. त्यानंतर ते छत्रपती संभाजीनगर येथे जाणार आहेत. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा दौरा अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.